










Blind Peer Reviewed Journal
ISSN No. 2230-9578

Journal of Research and Development
A Multidisciplinary Blind Peer Reviewed Journal
October 2023,
Volume – 15, Special Issue - 19

# "Advanced Studies in Geography"

Chief Editor
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram', Survey No. – 101/1,
Plot No. – 23, Mundada Nagar,
Jalgaon (M S) – 425 102

Guest Editor
**Dr. A. B. Jain**
Principal
KES's Pratap College (Autonomous),
Amalner, Dist. Jalgaon - 425 401

**Executive Editor**

Dr. S. R. Chaudhari    Dr. M. B. Chavan

**Co – Editors**

Dr. V. J. Patil    Dr. A. A. Badgujar    Dr. Shivaji B. Patil

**.....Address.....**
'Ravichandram', Survey No. – 101/1, Plot No. – 23
Mundada Nagar, Jalgaon (M S) – 425 102

# Journal of Research and Development

A Multidisciplinary Blind Peer Reviewed Journal
October 2023
**Volume – 15, Special Issue 19**
on


# "Advanced Studies in Geography"


**Chief Editor**

**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram', Survey No. – 101/1, Plot No. – 23
Mundada Nagar, Jalgaon (M S) – 425 102

**Guest Editor**

**Dr. A. B. Jain**
Principal
KES's Pratap College (Autonomous),
Amalner, Dist. Jalgaon - 425 401 (Maharashtra)

**Executive Editor**

**Dr. S. R. Chaudhari**
Ex Principal
Pratap College, Amalner

**Dr. M. B. Chavan**
Ex Principal
Pratap College, Amalner

**Co – Editors**

**Dr. V. J. Patil** **Dr. A. A. Badgujar** **Dr. Shivaji B. Patil**

**Editorial Board**

**Dr. K. S. Nile** **Dr. P. D. Patil** **Dr. R. C. Ahire**
**Dr. J. G. Patil** **Dr. R. D. Ingale** **Dr. K. M. Gavit**
**Dr. P. S. Chaudhari** **Dr. M. K. Mahajan**


**Published by – Principal, Pratap College (Autonomous), Amalner, Dist. Jalgaon**

The Editors shall not be responsible for originality and thoughts expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

**© All rights reserved with the Editors**

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | Mr. Kishor Arjun Pachavane, Dr. Nandini P. Wagh | Impact of lumpy virus on bovine animals of Dhule District with the Spatial reference to Shipur Tehsil | 179 |
| 31 | Mr. Ajay D. Patil | Role Of Geography on Indian Agriculture System | 185 |
| 32 | Prof. Santosh Prakash Patil | A Geographical Analysis Diarrhea Diseases in Satara District | 189 |
| 33 | Mrs. Dipali Suresh Thakare | Spatial pattern of housing in newly emerged Kusumba village after desertion | 194 |
| 34 | Dr. M. A. Vasave, Dr. S. B. Garud, Dr. R. Z. Yashod | Analysis of Normalized Differences Vegetation Index (NDVI) and Soil Adjusted Vegetation Index (SAVI) in Satpura foothills using Google Erath Engine Algorithms | 200 |
| 35 | Mr. Hemant S. Nandre, Dr. Shivaji B. Patil | Decadal Growth of Population in Dhule District: A Geographical Analysis | 210 |
| 36 | डॉ. पंकज युवराज शिंदे, अरुण भबुतराव महाजन | जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येतील स्थल कालसापेक्ष बदल | 214 |
| 37 | डॉ. कुंदन अ. अलोणे | वैद्यकीय भूगोलाचे मूलभूत तत्त्वे आणि संकल्पना | 220 |
| 38 | प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार | बुलढाणा पठारावरील पर्यटन स्थळांच्या वाहतूक प्रणालीचे प्रारूप:- भौगोलिक अभ्यास | 226 |
| 39 | डॉ. प्रफुल्ल सुधाकर ठाकरे | जळगाव जिल्ह्याच्या पर्वतपदीय क्षेत्रातील कृषी आधुनिकीकरणाच्या पातळयांचा अभ्यास | 230 |
| 40 | प्रा. विश्वनाथ देविदास पाटील | हवामान परिवर्तनाच्या विळख्यात भारतीय शेती | 239 |
| 41 | डॉ. पंकज युवराज शिंदे, श्री. प्रमोद साहेबराव पाटील | हवामान बदल आणि त्याचा कृषीवर होणार परिणाम | 242 |
| 42 | डॉ. अमोल रा. भुयार, डॉ. संजय ना. कपले | नंदुरबार जिल्ह्यातील बदलत्या जंगलव्याप्त क्षेत्राचा भौगोलिक अभ्यास | 246 |
| 43 | डॉ. कराळे एन. बी. | सोलार शहर सांची – एक भौगालिक अभ्यास | 252 |
| 44 | प्रा. अभिजीत प्रभाकर दोड, प्रा. डॉ. सुनील बी. आखरे | पश्चिम विदर्भातील कृषी पर्यटन केंद्रांचा विकास एक अध्ययन | 256 |
| 45 | प्रा. कुणाल अनिलराव झोटींग | अडान नदी खोऱ्यातील कृषी नियंत्रित बाजार केंद्राचे सरासरी क्षेत्रानुसार गुणोत्तर : एक भौगोलिक अध्ययन | 262 |
| 46 | प्रा. नितिन भिमराव थूल, डॉ. अविनाश वसंतराव तलमले | भंडारा जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य सेवाकेंद्र, डॉक्टर व परिचारिका यांचा कालिक अभ्यास | 266 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary Blind Peer Review Journal, ISSN No. 2230-9578,
October 2023, Special Issue 19, Volume – 15, "Advanced Studies in Geography"

# पश्चिम विदर्भातील कृषी पर्यटन केंद्रांचा विकास एक अध्ययन

**प्रा. अभिजीत प्रभाकर दोड**
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगाव रेल्वे जिल्हा अमरावती

**प्रा. डॉ. सुनील बी. आखरे**
कला व विज्ञान महा. कु.हा ता. तिवसा
जि. अमरावती

**सारांश**

एकविसाव्या शतकामध्ये संपूर्ण जगामध्ये वैयक्तिक व सामाजिक उन्नतीसाठी अनेकविध मार्ग उपलब्ध आहेत आजच्या काळात संपूर्ण जगामध्ये भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये विशेषता पश्चिम महाराष्ट्रात कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये कृषी पर्यटन केंद्रांचा मोठया प्रमाणात विकास होत आहे शेतीमध्ये पर्यटनाच्या माध्यमातून आर्थिक उन्नती गाठण्यासाठी मोठया प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत या प्रयत्नांना चांगल्या प्रकारे यश येताना दिसून येत आहे. कारण महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रांची संख्या 550 इतकी असून त्यातील साडेतीनशे पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्रे ही एकटया पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहेत या दृष्टीने विचार केल्यास महाराष्ट्र ातील विदर्भ विभाग व त्यातही प्रामुख्याने पश्चिम विदर्भामध्ये एकंदरीतच कृषीचा व कृषी पर्यटन केंद्रांचा सुद्धा विकास पुरेसा झालेला नाही यामागे अनेक काही कारणं आहेत परंतु थोडक्यात कृषी व कृषी पर्यटन केंद्रांचा विकास न झाल्याने हा भाग शेतकरी आत्महत्याच्या दृष्टीने संवेदनशील बनलेला असून महाराष्ट्रात होणाऱ्या एकूण शेतकऱ्यांच्या-आत्महत्यांमध्ये सर्वाधिक आत्महत्येचे प्रमाण हे पश्चिम विदर्भातील अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा व यवतमाळ या जिल्ह्यामध्ये आहे पश्चिम विदर्भातील या जिल्ह्यामध्ये होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या तीव्रतेची दखल केंद्र शासनाने घेतल्यानंतर या भागात कृषीमध्ये उत्पन्न वाढीसाठी अनेक उपाययोजना आखण्यात आल्या परंतु तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या मध्ये फार मोठया प्रमाणात घट दिसून आली नाही म्हणजेच शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नती मध्ये भर घडण्यासाठी व शेतकरी आत्महत्या कमी करण्यासाठी पारंपारिक उपायाबरोबरच आधुनिक उन्नत उपायांचा सुद्धा उपयोग करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने कृषी पर्यटन केंद्र स्थापन करून त्याद्वारे पर्यटकांना जेवणाची, पर्यटनाची, कृषी संस्कृतीची व स्थानिक पर्यावरणाची माहिती करून देणे व त्याकरता फी आकारून त्या मोबदल्यामध्ये त्यांचे समाधान करणे हा एक चांगला उपाय असू शकतो या दृष्टिकोनातून अमरावती विभागामध्ये 2023 पर्यंत एकूण 29 कृषी पर्यटन केंद्र अधिकृत नोंदवण्यात आलेली आहेत या कृषी पर्यटन केंद्राद्वारे भेटी देणाऱ्या लोकांचे मनोरंजन केले जाते त्यांना शेतातील पिकांबद्दल माहिती दिली जाते शेतातील कृषी यंत्रे अवजारे यासंबंधी अवगत केले जाते तसेच पर्यटकांना शेताची सफर करून देण्यात येते काही पर्यटक स्वतः शेती करण्याचा प्रयोग करून पाहतात तसेच आपल्या मुलांनाही शेती व शेतीतील पाळीव प्राणी यांची ओळख करून देतात या माध्यमातून कृषी पर्यटन केंद्र संचालकांना म्हणजेच शेतकऱ्यांना मोठा आर्थिक लाभ होताना दिसत आहे तसेच या केंद्रांच्या माध्यमातून इतर काही लहान–मोठी केंद्रे विकसित होऊन त्याद्वारे कृषी पर्यटन केंद्र हळूहळू का होईना विकसित होताना दिसत आहेत

**बीजसंज्ञा** – पर्यटन, पर्यटक, कृषी पर्यटन

**प्रस्तावना**

आज संपूर्ण जगात पर्यटन हा एक महत्वाचा व्यवसाय मानला जात आहे. जगातील बहुतेक सर्वच देश पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी विषेश प्रयत्न करतांना दिसत आहेत. कुठल्याही देशात पर्यटनाचा विकास झाल्यास त्या देशाला त्याचा मोठया प्रमाणात फायदा मिळतो.

पर्यटन हि संज्ञा प्रवास Tour या शब्दापासून तयार झाली आहे. प्रवास Tour हा शब्द लॅटीन भाषेतील Tornos या शब्दापासून तयार झाला आहे Tornos या शब्दाचा मूळ अर्थ वर्तुळ किंवा वर्तुळाकार प्रवास असा होतो. एका व्यक्तीने कींवा व्यक्ती समुहाने एका ठिकाणाहून दुस.या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी किंवा कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. प्रवासासाठी बाहेर पडणे, भटकंती करणे, ज्ञानार्जन मिळवणे व मूळ ठिकाणी परत येणे या संपूर्ण प्रक्रियेला पर्यटन म्हणतात.

पर्यटनाच्या व्याख्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**हर्मन –**

'एखादया अपरीचीत देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन, मुक्काम, आजुबाजूच्या स्थळांना भेटी देऊन पुन्हा स्वगृही परत जाणे म्हणजे पर्यटन होय'.

**हूंजीकर व फ्रँक –**

'कायम स्वरुपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधीत नसलेली, अपरीचीत व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित आलेली अपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय'.

**जोस अँरीलागा –**

"सायकल वरून प्रवासासाठी फिरणे, गिर्यारोहण, नौकाविहार, खेळ, निसर्ग निरीक्षण इत्यादी साठी भ्रमण करणे, मुक्काम करणे म्हणजे पर्यटन होय.'

थोडक्यात आपल्या मुळ ठिकाणापासून मनाला आनंद मिळविण्यासाठी प्रवास करून परत येणे म्हणजे पर्यटन होय.

**ऑक्सकोर्ड शब्दकोश –**

'जो उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुस.या ठिकाणी मनोरंजनासाठी प्रवास करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय'.

थोडक्यात एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी 24 तास वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.

एकविसाव्या शतकात पर्यटनाचा कल बदलत चालला आहे. पूर्वी धार्मिक कींवा मनोरंजनासाठी पर्यटन करणे हा हेतू मुख्य होता आता मात्र नवनवीन पर्यटन प्रकार समोर येत आहेत. उदा. साहसीपर्यटन, आरोग्य पर्यटन, कृषी पर्यटन, क्रिडापर्यटन, आपत्ती पर्यटन इत्यादी कृषी पर्यटन हा प्रकार सध्या वेगाने विकसीत होत आहे. शहरी भागातील नागरीकांना ग्रामीण भागातील जीवनपद्धती चे नेहमीच आकर्षण असते. आपल्या दैनंदिन जीवनातील ताणतणाव व नैराश्य घालविण्यासाठी कृषी पर्यटन केले जाते. शेती, पाळीव प्राणी, पीक पद्धती, ग्रामीण वातावरण इ. प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी कृषी पर्यटन केले जाते.

कृषी पर्यटनाच्या व्याख्या पुढील प्रकारे सांगता येतील

आपल्या शेती व्यवसायातून अधिक उत्पन्न मिळण्यासाठी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने शेतकरी व ग्रामीण जनता यांच्या तर्फे दिल्या जाणार[2]या सोईसुविधा व सेवा स्वरुपाच्या अनेक कृती म्हणजे कृषी पर्यटन होय. निसर्ग सहवासात अनुभव आनंद देत शेतकरयाने आपल्या कसलेल्या शेतावर पर्यटकांच्यासाठी घडवलेली सहल म्हणजे कृषी पर्यटन होय.

थोडक्यात शेतावरील फेरफटका, ग्रामीण संस्कृतीची ओळख, आनंद मिळविण्यासाठी शहरातील लोकांनी शेतात जाऊन राहणे म्हणजे कृषी पर्यटन होय. कृषी पर्यटन हि संकल्पना नवीन आहे. कृषी पर्यटनाचा ख.या अर्थाने विकास 2004 पासून झाला. महाराष्ट्र राज्य हे कृषी पर्यटनास चालना देणारे पहिले राज्य आहे. ऑस्ट्रेलिया, जपान, कॅनडा व यूरोपीय देशात कृषी पर्यटन

लोकप्रिय आहे. पर्यटनातील पर्यटक हा शब्द 1292 साली अस्तीत्वात आला लॅटिन भाषेतील Tourn या पासून Tourist हा शब्द तयार झाला. पर्यटकांच्या व्याख्या पुढील प्रमाने सांगता येतील.

**संयुक्त राष्ट्र संघटना –**

एखाद्या देशात 24 तासापेक्षा जास्त आणी कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने 6 महीन्यापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.

आजच्या काळांत पर्यटन हा जगातील वेगाने विकसीत होणारा प्रमुख आर्थीक व्यवसाय आहे. जगातील काही देशांची अर्थव्यवस्था ही केवळ पर्यटन व्यवसायावरच वृद्धीगंत झालेली दिसते. उदा. मालदिव, मलेशिया, थायलंड इत्यादी, या दृष्टीने विचार केल्यास भारत देशाचा पर्यटनाच्या बाबतीत अद्यापही बराच मागे असलेला दिसून येतो. जेव्हा की पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असलेले बहूतांश घटक भारतात आढळतात. भारतातील पर्यटनाच्या विकासासाठी देशातील कृषी पर्यटनाला चालना देणे हे अत्यंत गरजेचे आहे.

आजच्या धकाधकीच्या काळात शहरी भागातील लोकांना मानसिक ताणतणावाला सामोरे जावे लागते. यावर एक उपाय म्हणून शहरी भागातील लोक मोठ्या प्रमाणात कृषी पर्यटनाकडे वळल्या जात आहे असे दिसते. ग्रामिण भागातील जीवन, संस्कृती, पर्यावरण, पशुपक्षी, कृषी व्यवसाय, शहरी भागात दिसत नाहीत. त्यामुळे लोकांचा कल साहजिकच ग्रामीण भागातील कृषी पर्यटनाकडे वाढत असलेला दिसतो. शहरातील नागरीक आपल्या पाल्यांना जुन्या काळातील लोकजीवन, ग्रामिण संस्कृतीची ओळख करून देण्यासोबतच शेतकऱ्यांना उत्पादन, रोजगार व उत्पन्न मिळवून देशाच्या उद्देशानेही कृषी पर्यटनाकडे वळतांना दिसत आहे.

सुमारे 10,000 वर्षापूर्वी कृषीचा मानवाने शोध लावला. जगातील अगदी सूरवातीला शेतीची सुरुवात करणाऱ्यां देशांमधे भारताचा समावेश होतो. भारतातील सिंधु, गंगा, यमुना, सतलज नदयांच्याकाठी कृषी संस्कृतीचा विकास झाला. या प्रमाणेच महाराष्ट्र राज्यात गोदावरी, कृष्णा, भिमा, तापी, पूर्णा, वर्धा या खोऱ्यात कृषी चा विकास झाला. थोडक्यात कृषी किंवा शेती व्यवसाय हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. आजही महाराष्ट्रातील 58 % लोकसंख्या कृषी व कृषी पूरक उद्योगावर अवलंबून आहे. यामध्ये फलोत्पादन, डेअरी व्यवसाय, शेळीमेंढी पालन, कुक्कुट पालन, मधनिर्मिती, रेशीम उद्योग, मस्त्यव्यवसाय व्यवसायांचा समावेश होतो. यासोबतच आजच्या काळात कृषी पर्यटन हा व्यवसाय शेती क्षेत्रात उर्जीतावस्था निर्माण करू शकतो तसेच शेतकऱ्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होऊ शकते.

भारतात जागतीकीकरण धोरण अमंलात आल्यानंतर जे परीणाम दिसायला लागले त्यांचा कृषी वरील प्रभाव अभ्यासल्यास असे दिसून येते की, पूर्वीपेक्षा कृषी निविष्ठांचा वापर वाढल्याने शेतीवरील खर्च वाढत गेला यामूळे पूर्वी बहुदा फायद्याची असणारी शेती ही दिवसेंदिवस तोटयाची होवू लागली. याची परिणीती म्हणून शेतकऱ्यांचे अर्थचक्र बिघडले व शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढू लागले. पश्चिम विदर्भ हा भारतातील शेतकरी आत्महत्येचा हॉटस्पॉट म्हणून ओळखल्या जाऊ लागला. शेतकरी वर्गास या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी शेतीच्या पारंपारीक कृषीपूरक व्यवसाया बरोबरच एक श्वाश्वत उपाय म्हणून कृषी पर्यटन हा उत्तम पर्याय पुढे आला आहे. कृषीपर्यटनाच्या साह्याने शेतकरी आपली शेती फायदेशीर व प्रयोगशील करू शकतात या करीता कृषी पर्यटनाचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.

**संशोधन पद्धती.**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी अभ्यास क्षेत्र पश्चिम विदर्भ असल्याने या भागातील अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशीम व बुलढाणा या जिल्ह्यातील कृषी पर्यटन केंद्राची निवड करून संशोधनासाठी अभ्यास करण्यात येणार आहे.

कृषी पर्यटनाच्या ठिकाणी भेटी देणाऱ्या आणी कृषी पर्यटन संचालकांना संशोधनाचे एकक म्हणून यादृच्छीक नमुना निवड पद्धतीने त्यांची निवड करण्यात येईल.


खालील पद्धतीच्या माहितीच्या आधारे प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

**प्राथमिक स्रोत** – कृषी पर्यटन निर्मीती व विकासासाठी मदत करणारे सर्व संबंधीत घटकांच्या मुलाखती घेऊन माहीती संकलीत करण्यासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येईल.

**द्वितीय स्रोत** – प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्रोतामध्ये सदर संशोधना विषया संदर्भातील कृषी पर्यटन विषयक पुस्तके, सहायक ग्रंथ, लेख, विविध संशोधन अहवाल, शासकीय व अशासकीय अहवाल यांचा वापर करण्यात येईल.

**अभ्यास क्षेत्र** –

पश्चिम विदर्भाचे स्थान हे भारताच्या मध्यवर्ती तर महाराष्ट्र राज्याच्या पूर्व भागात आहे. पश्चिम विदर्भात अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा या पाच जिल्ह्याचा समावेश होतो. यालाच अमरावती प्रशासकीय विभाग असे सुध्दा म्हणतात.



पश्चिम विदर्भाचा अक्षवृत्तीय विस्तार 12° 15° उत्तर ते 21° 45° उत्तर अक्षांश आणि रेखावृत्तीय विस्तार 76° पूर्व ते 79 15° पूर्व रेखांश आहे. पश्चिम विदर्भाचे एकूण क्षेत्रफळ 45, 384 चौ. कि. मी. असून हे क्षेत्रफळ महाराष्ट्र राज्याच्या 14. 15 % एवढे आहे. पश्चिम विदर्भाच्या उत्तरेस मध्यप्रदेश राज्य, पूर्वेस पूर्व विदर्भ (नागपूर प्रशासकीय प्रदेश), दक्षिणेस मराठवाडा आणि तेलंगणा राज्य तर पश्चिमेस जळगाव व औरंगाबाद हे जिल्हे आहेत. (डॉ. ए. बी. सवदी (2004).

एखाद्या प्रदेशात पर्यटनाचा विकास त्या प्रदेशातील ठळक आकर्षणामुळे होत असतो. पश्चिम विदर्भातील सर्वच कृषी पर्यटन केंद्रांचा उपयोग पर्यटनाच्या दृष्टीने कसा करता येईल हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे. तसेच पर्यटन विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे हा होय.

**विषय विवेचन व विश्लेषण** –

पश्चिम विदर्भ हा महाराष्ट्रातील उत्तर पूर्व मध्य भागात असलेला भूप्रदेश असून या भागात पूर्णा नदीने सुपीक मैदानाची निर्मिती केलेली आहे परंतु पूर्णा नदी खोऱ्यामध्ये सुमारे दहा हजार चौकीमीचा नदीच्या दोन्ही काठा लगतचा ४० ते ५०

किलोमीटरचा प्रदेश हा खारपाण पट्ट्यामध्ये येत असल्याने या भागात शेतजमिनीला जलसिंचनाची व्यवस्था करता येत नाही कारण तसे केल्यास ही जमीन क्षारयुक्त होऊन ती नापीक बनते यामुळे या भागात शेती व्यवसाय हा पूर्णपणे मोसमी पावसावर अवलंबून आहे परंतु मोसमी पावसाच्या लहरीपणामुळे पावसात अनियमितता झाल्यास पीक उत्पादनात प्रचंड घट निर्माण होते याचा परिणाम शेतकऱ्यांच्या पीक उत्पादनावर होऊन त्यांचे उत्पन्न अत्यंत मर्यादित होते. यामुळे शेतकयाचे अर्थचक्र बिघडून त्याला त्याच्या दैनंदिन गरजा भागवताना तारेवरची कसरत करावी लागते याची परिणीती सर्वात शेवटी तो मानसिकरित्या खचल्याने शेतकरी आत्महत्या मध्ये होते. या भागात जलसिंचनामुळे शेती क्षेत्राला मिळणारी निश्चितता नष्ट झाल्यामुळे शेती क्षेत्रामध्ये उत्पन्नाची हमी देण्याकरता कृषी पर्यटन केंद्र निर्माण करणे हा एक चांगला पर्याय आहे या दृष्टीने या परिसरामध्ये कृषी पर्यटन केंद्रांची स्थापना सुद्धा झालेली आहे व या केंद्रांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना दिसत आहे. पश्चिम विदर्भामध्ये एकूण कृषी पर्यटन केंद्रे २९ असून त्यामध्ये अमरावती जिल्ह्यामध्ये मीरा कृषी पर्यटन केंद्र रेवसा येथे आहे आपली वाडी कृषी पर्यटन केंद्र वलगाव येथे आहे समृद्धी कृषी पर्यटन केंद्र नांदगावपेठ येथे आहे अपेक्षा कृषी पर्यटन केंद्र गुरुकुंज मोझरी येथे आहे मुंदवाडा कृषी पर्यटन केंद्र मुंदवाडा येथे आहे लक्ष्मी कृषी पर्यटन केंद्र भानखेडा येथे आहे शशी कृषी पर्यटन केंद्र जयसिंगा येथे आहे मयूर कृषी पर्यटन केंद्र भानखेडा येथे आहे मंगलम कृषी पर्यटन केंद्र नया अकोला येथे आहे कान्हाई कृषी पर्यटन केंद्र हे छत्री तलाव अमरावती येथे आहे चेतन कृषी पर्यटन केंद्र हे नांदगाव खंडेश्वर येथे आहे आनझरी कृषी पर्यटन केंद्र हे चिखलदरा येथे आहे आदित्य कृषी पर्यटन केंद्र हे लोणी येथे आहे सातपुडा कृषी पर्यटन केंद्र भानखेडा येथे आहे फार्म हाऊस कृषी पर्यटन केंद्र नवसारी येथे आहे अकोला जिल्ह्यामध्ये वेदांतिनी कृषी पर्यटन केंद्र हे कान्हेरी येथे आहे भूमिपुत्र कृषी पर्यटन केंद्र हे सिरसो येथे आहे कल्पतरू महिला बहुउद्देशीय कृषी पर्यटन केंद्र आहे वेळकम येथे आहे अविनाश कृषी पर्यटन केंद्र हे कळंबेश्वर येथे आहे राधाकुंज कृषी पर्यटन केंद्र हे अंत्री मलकापूर येथे आहे शेतकरी वाडा हे कृषी पर्यटन केंद्र बहादुरा तालुका बाळापूर येथे आहे विद्याविहार कृषी पर्यटन केंद्र हे बार्शीटाकळी येथे आहे वाशिम जिल्ह्यामध्ये भूमी कृषी पर्यटन केंद्र हे आमखेडा तालुका मालेगाव येथे आहे अविनाश कृषी पर्यटन केंद्र हे कारंजालाड येथे आहे रानमेवा कृषी पर्यटन केंद्र हे मोहरड येथे आहे नेचर ब्लेस हे कृषी पर्यटन केंद्र मनभा येथे आहे दामोदरराव कृषी पर्यटन केंद्र हे वाशिम येथे आहे बुलढाणा जिल्ह्यामध्ये वैरागड कृषी पर्यटन केंद्र हे चिखली येथे आहे मामाचे वावर कृषी पर्यटन केंद्र वाटली येथे आहे महाजन वावर कृषी पर्यटन केंद्र हे चिखली येथे आहे सह्याद्री कृषी पर्यटन केंद्र हे मोहाडी घटकाली येथे आहे यवतमाळ जिल्ह्यामध्ये सिताराम कृषी पर्यटन केंद्र हे पिंपळखुटा येथे आहे बांबूसा कृषी पर्यटन केंद्र हे मांगुर्डा येथे आहे श्रीरामजी कृषी पर्यटन केंद्र हे कारेगाव बडकी येथे आहे सूर बहार कृषी पर्यटन केंद्र हे सूना येथे आहे आयुशी कृषी पर्यटन केंद्र हे चापरदा येथे आहे वृंदावन कृषी पर्यटन केंद्र हे सुना येथे आहे अनंत हेरिटेज हे कृषी पर्यटन केंद्र झुंजारपूर येथे आहे अशाप्रकारे पश्चिम विदर्भामध्ये २०२३ पर्यंत एकूण २९ कृषी पर्यटन केंद्र निर्माण झालेली आहे यापैकी मोठ्या शहरालगत असलेली कृषी पर्यटन केंद्र ही सर्वच दृष्टीने प्रगत असून त्यांचा भरपूर विकास झालेला आहे यामध्ये या कृषी पर्यटन केंद्रांपर्यंत राष्ट्रीय महामार्ग राज्य महामार्गाचे सुगम जाळे निर्माण झालेले आहे येथे मोठी शहरे असल्याने येथे आवासाची निवासाची व्यवस्था सुद्धा उच्च दर्जाची आहे सोबतच या कृषी पर्यटन केंद्रांमध्ये मनोरंजनाची साधने कृषी कार्याच्या माहिती संबंधी चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन होत असताना दिसत आहे परंपरागतच कृषी पर्यटनाच्या अर्थचक्राची गती सतत वाढत असल्याची दिसू देत आहे

**निष्कर्ष**

अशाच प्रकारे पश्चिम विदर्भातही अनेक कृषी पर्यटन केंद्र पर्यटन स्थळे आहेत. मात्र त्यांचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही. त्यामुळे पश्चिम पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यात पर्यटन विकासाकरीता भरपुर वाव आहे. परंतु त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची निवासस्थाने, हॉटेल्स, रेस्टॉरंटस, उत्तम दळणवळण वाहतुक व्यवस्था, नवीन पर्यटन स्थळांचा शोध व विकास, राष्ट्रीय

Journal of Research and Development
A Multidisciplinary Blind Peer Review Journal, ISSN No. 2230-9578,
October 2023, Special Issue 15, Volume - 15, "Advanced Studies in Geography"

व आगमनोत्तरासोबत या व्यवसायाची परिणामकारक वाढीसाठी या गोष्टींची आवश्यकता आहे. स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती, सहकारी कृषकांना, सांगली जिल्ह्याच्या आर्थिक विकासासाठी देशी व परदेशी पर्यटकांना प्रोत्साहन देऊन पर्यटन व्यवसायाचा विकास करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ -**

१) ठाकरे पांडुरंग बी २०१५ कृषी व ग्रामीण पर्यटन प्रकाशक कृषी पर्यटन विकास संस्था पुणे
२) दैवान दामले (२००७), प्रवास तंत्र आणि मंत्र, राजहंस प्रकाशन, पुणे
३) दास तन्मय, दास अनुपमा (ऑक्टो २०११) 'ग्रामीण पर्यटन का अर्थव्यवस्था पर प्रभाव' कुरुक्षेत्र मासिक
४) सावंत सु. अजिंठ्याचे महत्त्व, नितीन प्रकाशन, पुणे.
५) घाटोळे रा.ना. (१९९५). समाजशास्त्रीय संशोधन तत्त्व आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर.
६) घारपुरे विठ्ठल (२००१), पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड क. पब्लिशर्स, नागपूर.